दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २१६ | MAHMAR/2006/17212 | रायगड | रविवार, दि.२ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# दुबार-तिबारवाले मतदार आढळल्यास तिथेच फोडून काढा : राज ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आज मुंबईमध्ये महाविकास आघाडी आणि त्यांच्या समर्थक पक्षांनी सत्याचा मोर्चा आयोजित केला होता. हा मोर्चा निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांमधील घोळाविरूद्ध होता. यावेळी हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते. या मोर्चात विरोधकांची एकजूटही पाहायला मिळाली. मोर्चाला शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनेसेप्रमुख राज ठाकरे , राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात उपस्थित होते. या मोर्चात सर्वांनी निवडणूक आयोगाविरुद्ध जोरदार भाषणं केली. मतदार याद्या स्वच्छ करा मग निवडणुका घ्या, दुबार मतदारांची नावे हटवा अशी मागणी करण्यात आली आहे.






यावेळी राज ठाकरेंनीही घणाघाती भाषण केलेले पाहायला मिळाले. आपल्या भाषणामध्ये त्यांनी सत्ताधारी महायुतीवर हल्लाबोल केला. त्यांनी मतदारयाद्यांमधला घोळ स्वच्छ केल्याशिवाय निवडणुका घेऊ नका असं म्हटलं आहे. राज ठाकरेंनी यावेळी जे लोकं निवडणूक आयोगात घुसले आहेत. त्यांच्याकडून निवडणुका जिंकून घेतल्या जात असल्याचा आरोप केला आहे. याला काय निवडणुका म्हणतात का? एक आमदार स्वतः सांगतो की मी २० हजार मत बाहेरुन आतमध्ये आणली. म्हणजे यांची हिंमत बघा, सत्तेचा माज बघा, असं राज ठाकरे म्हणाले आहेत.

मतदारयाद्या तपासताना मुलीचं वय १४, वडिलांचं वय १४३, काहीही चालू आहे. नवी मुंबईमध्ये आयुक्तांच्या बंगल्यावर मतदार नोंदवले गेले आहेत. कोणी सुलभ शौचालयामध्ये नोंदवला गेला आहे. कुठेही बसलेला दिसला की नोंदवायचा का? असा प्रश्न राज ठाकरेंनी उपस्थित केला आहे. राज ठाकरेंनी 'सत्याचा मोर्चा'मध्ये मतदार याद्यातील घोळाबाबत बोलताना दुबार-तिबारवाले मतदार दिसताच फोडून काढणार, असा इशाराच दिला आहे. ते म्हणाले की, निवडून आलेले लोकही स्वतःला चिमटे काढून बघत होते. हे सगळे असे प्रकार सुरु आहेत. कशा निवडणुका घ्यायाच्या मला जरा सांगा. जो मतदार रांगेत उभा राहून मतदान करतो. त्याच्या मताला काय किंमत आहे. आधीतर तुम्ही या गोष्टी घरोघरी पोहोचवा, मतदार याद्यांमध्ये कसा घोळ सुरु आहे याबद्दल जनजागृती करा आणि त्यानंतरही जर समजा हे दुबार तिबारवाले मतदान सुरु असताना तिथे आले तर तिथेच फाडून काढायचे. बडव-बडव बडवायचे आणि मग पोलिसांच्या हातात द्यायचे. त्याशिवाय महाराष्ट्रामध्ये चाललेला हा प्रकार थांबणार नाही, असं राज ठाकरे म्हणाले आहेत.

यावेळी त्यांनी मतदार यादीत किती दुबार-तिबार मतदार आहेत, याची माहिती देणारी कागदपत्रे आपल्याकडे असल्याचा दावा केला आहे. तसेच त्यांनी ही सर्व कागदपत्रे असलेला गठ्ठाही सोबत आणलेला यावेळी पाहायला मिळाला. हजारो मतदारांनी दुबार मतदान केले आहे, आजचा मोर्चा ताकद आणि राग दाखवण्यासाठी आहे, असे ते म्हणाले.

## मतदारांनी जागरुक रहावं : उद्धव ठाकरे

निवडणूक आयोगाकडे अर्ज करणाऱ्याचं नाव होतं उद्धव बाळासाहेब ठाकरे, असं उद्धव ठाकरेंनी सांगितलं. त्यानंतर मंचावर, कार्यकर्त्यांमध्ये हशा पिकला. 'माझ्या नावानं कोणीतरी अर्ज केला होता. माझ्यासह माझ्या कुटुंबातील सदस्यांची नावं मतदार यादीतून वगळण्याचा प्रयत्न झाला. हा प्रकार गंभीर आहे. २३ ऑक्टोबर २०२५ रोजी अर्ज सक्षम नावाच्या ऍपवरुन अर्ज करण्यात आला होता. माझ्या नावानं खोट्या नंबरवरुन ओटीपी काढण्याता प्रयत्न झाला. या संदर्भात मी रितसर तक्रार दाखल केलेली आहे,' असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.



मतदार यादीतील घोळांचे, दुबार मतदारांचे सगळे पुरावे घेऊन आम्ही कोर्टात जाणार आहोत. त्यांच्याकडून न्याय मिळेल, अशी अपेक्षा आहे. निवडणूक आयुक्त लाचार असल्यानं त्यांच्याकडून आम्हाला अपेक्षा नाही. शिवसेना पक्ष आणि चिन्हाची सुनावणी तर गेल्या ३ वर्षांपासून सुरु आहे.

पण अद्याप त्यावर निकाल लागलेला नाही, अशी खंत उद्धव यांनी व्यक्त केली. 'शिवसेना, मनसे, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, कम्युनिस्ट पक्षांचे कार्यकर्ते मतचोरीचे प्रयत्न हाणून पाडतील. पण मतदारांनीदेखील जागरुक राहावं,' असं आवाहन उद्धव यांनी केलं.

## खोटेपणा सिद्ध करणाऱ्यालाच जेल : शरद पवार

शासनंच सगळ्यांना संरक्षण देत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच आता मतचोरी थांबवण्याची जबाबदारी आपली आहे असे आवाहनही त्यांनी केले.काही ठिकाणी काही लोकांनी तक्रारी केल्या. काही ठिकाणी सांगण्यात आलं की इथे बनावट आधार कार्ड मिळते. सिद्ध करून द्या हे आव्हान आले. डेमो दाखवला आणि हा आरोप ज्याने केला त्याच्यावर गुन्हा दाखल केला. खोटारडे आहेत हे सांगण्याचा, सिद्ध करण्याचा जर प्रयत्न कोणी केला तर त्याच्यावर गुन्हे दाखल होतात. याचा अर्थ हे शासन सगळ्याला संरक्षण देते. त्यामुळे तुमची आणि माझी जबाबदारी आहे, काही करा पण मतदानाची चोरी आम्ही थांबवणार. आपण स्वत:साठी काही मागत नाही. आपण ऐवढंच म्हणतो की लोकशाहीमध्ये सविधानानं जो अधिकार तुम्हा आम्हाला दिला त्याचे जतन करा. त्याची आज वेळ आली आहे. आपण बघितलं निवडणुका झाल्या आणि त्या निवडणुकीमध्ये विशेषत: विधानसभेच्या निवडणुकीत जे प्रकार झाले. त्यामध्ये सामान्य माणसाचा संसदीय लोकशाही यावरचा विश्वासाला धक्का बसला. आज अनेक ठिकाणी लोक अस्वस्थ आहेत. आजचा हा मोर्चा मला जुन्या गोष्टी आठवण करून देतो. तुम्ही सर्वांनी जी जबरदस्त एकजूट दाखवली. त्यातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण झाली.



# घरकुल देतो अशी बतावणी करून ज्येष्ठांना लुटणारा गजाआड

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा पोलिसांनी एका मोठ्या गुन्हेगाराला अटक केली आहे. सुनील गवस्कर (५०) या आरोपीने स्वतःला शासकीय अधिकारी म्हणवून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक केली होती. तो गोरेगाव तालुका माणगाव येथील रहिवासी आहे.तळा पोलिसांच्या पथकाने आरोपी गोरेगाव येथे येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. तळा पोलिस उपनिरीक्षक श्री विजय पाटील, अंमलदार विकास खैरनार यांनी सापळा रचून आरोपी याला अटक केली आहे.आरोपी कडून सोन्याची गळ्यातील गंठण,कानातील सोन्याच्या दोन कुड्या असा एकूण तीस हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.



तळा पोलिसांनी दिलेल्या फिर्यादी नुसार दि.२४ सप्टेंबर रोजी श्रीमती उर्मिला परशुराम नाडकर वय (५०) रा.बार्पे ता.तळा यांच्या राहत्या घरी अनोळखी इसम संध्याकाळी ६.३० सुमारास आला त्याने नाडकर परिवारातील मुलगा सुन यांची नावे घेऊन विश्वास संपादन केला मी तुमच्या परिवाराला चांगलं ओळखतो असे सांगून मी घरकुल मंजुरी, इन्शुरन्स आणि बँकेची कामे करतो असे सांगितले त्याने काही कागदपत्र काढून मी तुम्हाला घरकुल मंजूर करून देतो तुम्ही हा फॉर्म भरा आणि मला १४००० हजार रुपये द्या मी तुमचे घरकुल मंजूर करून देतो ? नाडकर यांनी सांगितले की,आमच्याकडे पैसे नाहीत तेव्हा तो म्हणाला की तुमच्याकडील सोन्याचे दागिने द्या घरकुल मंजूर झाल्यानंतर मी ते तुम्हाला परत करेन नाडकर यांनी या इसमास सोन्याचे दागिने दिले त्याने त्याचा मोबाईल नंबर दिला आणि तो निघून गेला दुसऱ्या दिवशी नाडकर यांनी त्या फोन वर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता फोन लागला नाही तेव्हा त्यांच्या निदर्शनास आले की आपली फसवणूक झाली आहे तेव्हा त्यांनी दि.१६ ऑक्टोबर रोजी पोलिसांकडे फिर्याद दाखल केली.पोलिसांनी महिले ची कलम ३१६(२), ३१८( ४), ३१९ व २०४ नुसार तक्रार घेतली आणि आरोपीस अटक केली आहे.

तळा सहाय्यक पोलिस निरीक्षक सतिश गवई यांच्या मार्गदर्शनाखाली तत्काळ तपास पथक नेमून तपास पथक अधिकारी श्री विजय पाटील अंमलदार विकास खैरनार , सागर रोहेकर , अविनाश वाघमारे, मिलिंद खिरीट यांनी सापळा रचला व आरोपी याला गोरेगाव येथून ताब्यात घेऊन गुन्ह्याचे तपासकामी अटक केले व फिर्यादी यांच्या तक्रारीनुसार सर्व मुद्दे माल जप्त केला आहे. सदरबाबत बारपे येथील फिर्यादी उर्मिला नाडकर यांचे कुटुंबीय व सर्व ग्रामस्थ मंडळ बारपे यांच्या कडून तळा पोलीस स्टेशन कडील अधिकारी व अंमलदार यांचे आभार मानत आहेत.बारपे येथील पोलीस पाटील कांतीलाल कसबले यांनी पोलिसांना सहकार्य केले. पोलिसांनी नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे. अशा प्रकारच्या बतावणी करणाऱ्या व्यक्तींपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. काही चोरटे कुटुंबातील मुलगा, मुलगी , सुन यांची ओळख दाखवून फसवणूक करत आहेत 'ज्येष्ठांना आमिष दाखवून त्यांना लुटण्याचा प्रकार देखील समोर आला आहे.त्यामुळे अनोळखी इसमापासून सावध रहा सतर्क रहा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### करंजा येथील १५ खलाशांसाठी अतिश कोळी व त्याचे सहकारी ठरले देवदूत...

# वादळात खोल समुद्रात अडकलेल्या २ बोटी टोईंग करून सुखरूप आणण्यात मिळाले यश

**दै.रायगड नगरी । उरण**

हवामानातील बदलामुळे झालेल्या अरबी समुद्रातील वादळात मागील सात दिवसांपासून खोल समुद्रात अडकलेल्या करंजा येथील दोन मच्छिमारी बोटी सुखरूप रित्या किनाऱ्यावर आणून १५ खलाशांना वाचविण्यासाठी समुद्रात मच्छिमार बोट घेऊन गेलेला अतिश कोळी या १५ खलाशांसाठी देवदूत ठरला आहे. उरण तालुक्यातील करंजा येथील मछिंद्र नाखवा यांच्या महागिरी व नमो ज्ञानेश्वरी या दोन मच्छिमार बोटी मुंबई पासून सुमारे ७ तासांच्या अंतरावरील खोल समुद्रात अडकल्या होत्या. या दोन्ही बोटींवर १५ खालशी आणि तांडेल होते. अरबी समुद्रात वादळी वाऱ्यामुळे या दोन्ही बोटी नादुरुस्त होऊन बंद पडल्या होत्या.



दोन्ही बोटीवरील जीपीएस आणि वायरलेस यंत्रणाही बंद पडल्याने त्यांच्याशी संपर्क करणे दुरापास्थ झाले होते.या बोटी खोल समुद्रात एकमेकांना बांधून नांगरून ठेवल्या होत्या. समुद्र खवळ लेला असल्याने या दोन्ही बोटींना किनारा गाठणे शक्य न झाल्याने २७ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी करंजा बंदरातून अतिश कोळी यांच्यासह तांडेल असलेले भानुदास कोळी,आणि आणखी एक तांडेल आणि बोटीचा मॅनेजर हे या बोटींच्या बचावासाठी निघाले होते. या बो्टींवरील जीपीएसही बंद पडल्याने मोबाईलमधिल जीपीएसच्या साहाय्याने सुमारे आठ तासांच्या कालावधीत मोबाईल वरील मिळालेल्या जीपीएसच्या लोकेशन ठिकाणी पोहोचला.

परंतु या दोन्ही बोटी जागेवर दिसून आल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी त्याच ठिकाणी थांबाण्याचा निर्णय घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळी या बोटींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता, सुमारे ९ ते १० किलोमीटर अंतरावर दोन बोटी आढळून आल्या. या दोन्ही बोटी नादुरुस्त झाल्याने त्या दोन्ही बोटी एकमेकांना बांधून नांगर टाकून ठेवण्यात आल्याचे बोटीचे तांडेल अमित यांनी सांगितले. या बोटीवर पंकज यादव, गुड्डू कुमार, संतोष कुमार, जगदीश, मनोज श्रवण यांच्या समावेत एकूण १५ खालशी होते. या दोन्ही बोटीवरील खलाशी हे तब्बल पाच दिवस न जेवता फक्त बिस्कीट आणि पाण्यावर राहिल्याचे खालशी राजकुमार यांनी सांगितले.

मंगळवारी सकाळी या तिन्ही बोटी एकमेकांना पाठोपाठ बांधून टोईंग करीत अतिश याने सहकाऱ्यांच्या मदतीने करंजा बंदराच्या दिशेने परतीचा प्रवास सुरु केला. त्यातच काही अंतरावर या बोटींचा दोर तुटला आणखी अडचणी वाढल्या. अखेर या सर्व संकटावर मात करीत सुमारे २४ तासांच्या प्रवासानंतर या नादुरुस्त बो्टींवरील १५ खलाशांसह तिन्ही बोटी करंजा बंदरात सुखरूप दाखल झाल्या. या नादुरुस्त बोटी परत आणण्यासाठी खोल समुद्रात मोठ्या धैर्याने गेलेल्या अतिश कोळी आणि त्यांचे सहकारी हे खलाशांसाठी देवदूत ठरले असल्याचे बोटीचे तांडेल रमेश नाखवा यांनी म्हटले आहे.

## वेडाचाराचा बळी

रोहित आर्या याने 'अ थर्सडे' ही बेवसीरिज पाहून त्यापासून प्रेरणा घेऊन १७ मुलांसह २० जणांना पवईच्या स्टुडिओत ओलीस ठेवले का? - या प्रश्नाचे उत्तर द्यायला आज तो हयात नाही. रोहितने ओलीस ठेवलेल्यांचा बळी घेण्याची योजना आखली होती का? एकेका मुलाला तो ठार करत गेला असता का, या व अशा असंख्य प्रश्नांचा गुंता मागे ठेवून तो गेला. त्यामुळे आता या प्रश्नांची उत्तरे आपापल्या पद्धतीने सोयीस्करपणे देण्यास सारेच मोकळे आहेत. रोहितने समजा भीषण हत्याकांड घडवले असते तर विरोधकांनी सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले असते. आता पोलिसांनी रोहितचा एन्काउंटर करायला हवा होता का? यावरून वाद, चर्चा सुरू झाल्या. त्या कोर्टकज्ज्यापर्यंत जातील. मात्र, वीस जीव वाचविण्याकरिता एक जीव घेतला, असा दावा सरकार व पोलिस करतील. रोहितच नव्हे तर, आजूबाजूचे शेकडो जण आज आभासी जग आणि वास्तव यातील फरक विसरून 'मनोरुग्ण' असल्यासारखे वर्तन करीत आहेत. रील व रिॲलिटी यातील अंतर लोकांनी पुसल्यानेच कुणी रील काढण्याकरिता कड्याच्या टोकावर जातो आणि खाली कोसळतो, पुराच्या पाण्यात उडी मारून वाहून जातो. रोहित हा 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियानातील पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्प राबवत होता. त्याला सरकारकडून दोन कोटी रुपयांचे बिल येणे होते. त्याने यापूर्वी दोन-तीनवेळा आंदोलन, उपोषण केले. मात्र, फारसे काही त्याच्या हाती पडले नाही. रोहितचे वैफल्यग्रस्त होणे स्वाभाविक आहे. मात्र, त्याने पैसे वसूल करण्याकरिता लहानग्यांना ओलीस धरण्याचा रील लाइफवरून स्वीकारलेला मार्ग वेडाचार आहे. ही कल्पना अंमलात आणण्यापूर्वी रोहितने आपला सुज्ञ मित्र, बँकेत नोकरी करणारी पत्नी किंवा एखादा मानसशास्त्रज्ञ यांना बोलून दाखवली असती तरीही रोहित आज जिवंत असता. त्यामुळे रोहित हा आभासी जगाचा वास्तवातील बळी आहे. एआय अधिक विकसित झाल्यावर असे अनेक बळी जाणार आहेत. रोहितने दोन वर्षांपूर्वी सरकारच्या शिक्षण खात्याशी संबंधित योजनेचे काम केले व त्याचे दोन कोटी रुपये तो मागत होता. राज्यातील विविध खात्याशी संबंधित कंत्राटदारांचे ९० हजार कोटी रुपये थकले असून, दोन वर्षे सतत संघर्ष केल्यावर आता सरकारने केवळ १२ हजार कोटी रुपये दिले. एक-दोन कंत्राटदारांनी आत्महत्या केल्या. अन्य कंत्राटदारांनी रोहितसारखे लोकांना ओलीस ठेवावे की स्वतःवर गोळी चालवून संपवून घ्यावे, याचे मार्गदर्शन आता सरकारनेच करावे. सरकारच्या सर्वच खात्यात बिले काढायला एकूण रकमेच्या १० टक्क्यांपासून ३० टक्क्यांपर्यंत लाच मागितली जाते हे उघड गुपित आहे. म्हणजे अगोदर बिले थकवायची, कंत्राटदारांना जेरीस आणायचे व नंतर पैसे उकळायचे हे अधिकारी, कर्मचाऱ्यांपासून अनेक उच्चपदस्थांचे वर्तन दरोडेखोरांपेक्षा भीषण आहे. कंत्राटदारांनी भ्रष्टाचार करावा व बिलाची अपेक्षा ठेवू नये, अशी व्यवस्था राज्यात निर्माण झाली आहे. त्यामुळे रोहित हा या भ्रष्ट व्यवस्थेचाही बळी आहे. रोहितने मुलांना ओलीस ठेवल्यानंतर तास-दीड तास पोलिस त्याच्याशी संवाद करीत होते. मात्र, त्याच्या नेमक्या मागण्या पोलिसांना कळल्या नाहीत, असे पोलिस सांगतात. पोलिसांनी हे संभाषण नक्कीच रेकॉर्ड केले असेल. रोहितने त्यात कुणा बड्या नेत्यांची, अधिकाऱ्यांची नावे घेतली का? पोलिसांनी हे संभाषण जाहीर करायला हवे. पोलिस स्टुडिओत शिरले तेव्हा रोहित एअरगन घेऊन होता. त्यामुळे पोलिसांनी त्याच्या थेट छातीत गोळी झाडली. पायावर, हातावर गोळी झाडून त्याला ताब्यात घेणे अशक्य होते का? तुरुंगवासाचा दांडगा अनुभव असलेले काही एन्काउंटर स्पेशालिस्ट या कृतीचे समर्थन करीत आहेत. बदलापूरच्या शाळेत विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या अक्षय शिंदे यालाही पोलिसांनी काही महिन्यांपूर्वी असेच एन्काउंटरमध्ये मारले. उच्च न्यायालयाने त्याची गंभीर दखल घेतली. शिंदेच्या आई-वडिलांचा आवाज सरकारने दडपला; पण, न्यायालयाने चौकशीचे आदेश दिले. या प्रकरणातही कदाचित सरकार, पोलिस तसेच करतील. शिंदेचे एन्काउंटर करणाऱ्या पोलिसांना सरकारने क्लीन चिट दिली. त्यामुळे रोहित हा कायद्यापेक्षा गोळीने सोक्षमोक्ष लावण्याच्या प्रबळ होत असलेल्या मानसिकतेचाही बळी आहे.

## शिक्षण क्षेत्रात पोस्कोचा पुढाकार-१५ व्या शाळेचे नुतनीकरण यशस्वीरित्या पूर्ण

**दै.रायगड नगरी । माणगव**

दि. १४ ऑक्टोबर रोजी रा. जि. प. केंद्र शाळा, जिते या शाळेचा उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहात व आनंदमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीचे अधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.




या शाळेचे नुतनीकरण पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत केले आहे. कंपनीने विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, आधुनिक आणि आकर्षक शिक्षणाचे वातावरण निर्माण करण्याचा उद्देश ठेवून हे कार्य हाती घेतले. ही कंपनीच्या उडठ उपक्रमांतर्गत नुतनीकरण झालेली १५ वी शाळा आहे, ज्यामुळे शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाची जाणीव होते.

नुतनीकरणाच्या कामांत शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, संपूर्ण रंगकाम, इलेक्ट्रिकल फिटिंग, ग्रंथालय, रंगमंच तसेच पायाभूत सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. ही शाळा केंद्रशाळा असल्याने इतर शाळांचे विविध कार्यक्रम, उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि शैक्षणिक बैठकाही याच ठिकाणी पार पडतात. त्यामुळे नव्याने उपलब्ध झालेल्या या सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग आणि स्थानिक समाजालाही होणार आहे. या सोयींचा थेट लाभ ३७ विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

कार्यक्रमादरम्यान जिते केंद्राचे केंद्रप्रमुख यांनी पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी कंपनीच्या शैक्षणिक उपक्रमांचे, जसे की शालेय साहित्य वाटप, दप्तर वितरण, तसेच इतर शाळांच्या नुतनीकरण कार्याचे कौतुक करताना सांगितले की, पोस्को कंपनीची समाजाप्रतीची भावना आणि जबाबदारी त्यांच्या प्रत्येक उपक्रमातून दिसून येते. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी घेतलेले हे प्रयत्न खरोखरच प्रेरणादायी आहेत.

याचबरोबर, ऑगस्ट महिन्यात दुर्गम भागातील रा. जि. प. शाळा, बहिरीवाडी या शाळेचेही नुतनीकरण पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने केले आहे. अत्यंत दुर्गम ठिकाणी असलेल्या या शाळेची पूर्वस्थिती दयनीय होती. छतावरून पाणी गळणे, जुन्या खिडक्या, मर्यादित साधने यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यात अडचणी येत होत्या. या परिस्थितीत पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने पुढाकार घेत शाळेचे संपूर्ण नुतनीकरण पूर्ण केले.

शाळेच्या छतावर नवीन व टिकाऊ पत्रे बसवण्यात आली, जुन्या खिडक्यांच्या जागी ग्रिलसह स्लाइडिंग खिडक्या बसवण्यात आल्या तसेच संपूर्ण इमारतीला आतून व बाहेरून रंगकाम करून दिले. त्यामुळे आता शाळेला नवे, आकर्षक रूप प्राप्त झाले असून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व सुरक्षित वातावरण निर्माण झाले आहे.

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी शिक्षणाबरोबरच आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकासासाठीही विविध उपक्रम सातत्याने राबवत आहे. ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासासाठी कंपनीच्या उडठ विभागाने घेतलेले हे पाऊल स्थानिक समाजात आदर्श निर्माण करणारे ठरले आहे.

शिक्षण हा पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या सामाजिक उपक्रमांचा केंद्रबिंदू असून, कंपनीचा विश्वास आहे की - सशक्त समाजाचा पाया गुणवत्तापूर्ण शिक्षणात आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्तम पायाभूत सुविधा आणि सकारात्मक शिक्षणाचे वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दिशेने या प्रकल्पांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. हा प्रकल्प केवळ एक CSR उपक्रम नसून भविष्यातील सुशिक्षित, सशक्त आणि प्रगत समाजाच्या निर्मितीकडे नेणारे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. पोस्को महाराष्ट्र स्टीलचा हा पुढाकार निश्चितच इतर उद्योगांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरेल.

## पुष्पक नगर परिसरात झालेल्या दोन चोऱ्यांमध्ये लाखोंचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील नव्याने उभारण्यात आलेल्या पुष्पक नगर परिसरात झालेल्या दोन चोऱ्यांमध्ये लाखोंचा ऐवज लंपास अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे. त्यामध्ये अंबादास उंबरे हे त्यांच्या राहत्या घरात झोपले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या राहत्या घराच्या हॉलमधील खिडकीची काच सरकावून त्या वाटे घरात प्रवेश करून त्यांच्या घरातील लोखंडी कोठीमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने , रोख रक्कम व मोबाईल फोन तसेच त्यांच्या घरा शेजारी राहणारे संजय झुगे यांच्या घरातील मोबाईल फोन व रोख रक्कम असा मिळून दोन्ही घरातील ५,९२,००० /- रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

## सवाद येथे त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्रीशंकरमहाबळेश्वराची महायात्रा





**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुक्यातील सवाद येथील नवसाला पावणारे जागृत देवस्थान श्री शंकराची महायात्रा कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेला बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी होत आहे. दरवर्षी कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेला रात्री श्री शंकराची महायात्रा प्रचंड गर्दी आणि उत्साहात भक्तीमय वातावरणात होत असते. यंदा पावसाचे सावट महायात्रेवर असले तरी पोलादपूर तालुक्यातील पहिली यात्रा असल्याने या सर्वजातीधर्मसमभावाच्या सप्तक्रोशीतील हिंदू, मुस्लीम व बौध्दधर्मियांचा एकोपा या यात्रेत दिसून येतो.

मुंबई,ठाणे, पुणे, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने भाविक महादेवाच्या दर्शनाला येत असतात, यंदाही कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेदिवशी श्री शंकराची महायात्रा संपन्न होत आहे, यासाठी श्री महाबळेश्वर देव ट्रस्ट सवाद भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहेत.

मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते ९ कमळ वाहून विष्णु पूजन, बुधवार, दि.५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच ते सहा वाजेपर्यंत सदगुरू कृपा महिला मंडळ सवाद यांचा हरिपाठ, सायंकाळी सहा ते आठ वाजता पर्यंत त्रिपुर आरती दीपपूजन, रात्री आठ ते बारा वाजता पर्यंत सप्तकृषी ग्रामस्थांची भजने, रात्री बारा ते दोन वाजता पर्यंत श्री शंकराची पालखी मिरवणूक, रात्री दोन ते सकाळी सात वाजेपर्यंत रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील तळेघर आई जननीमाता तमाशा मंडळ आणि चिंचोळी येथील कालभैरवनाथ तमाशा मंडळ यांचा शक्ती तुरा जंगी सामन्यांचे आयोजित करण्यात आले आहेत.

## कर्जतमध्ये राष्ट्रीय एकता दौड संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत काल ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस अनुषंगाने राष्ट्रीय एकता दौड चे आयोजन करण्यात आले होते.

सदर एकता दौड श्री विठ्ठल मूर्ती कर्जत येथून सकाळी ७- ३० वाजता सुरू होऊन- श्रीरामपूर-महावीर पेठ- मुख्य बाजारपेठ कर्जत-जकात नाका- रेल्वे स्टेशन येथे येऊन ८-०० वाजता समाप्त झाली आहे. सदर राष्ट्रीय एकता दौड मध्ये उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल गायकवाड, कर्जत पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप भोसले, तसेच कर्जत पोलीस ठाण्यामधील ३ अधिकारी,१५ अंमलदार, आर सी पी प्लाटून २५ अंमलदार व प्रहार अकॅडमी, देवा अकॅडमी,कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयातील ३५० ते ४०० विद्यार्थी विद्यार्थिनींनी यांनी राष्ट्रीय एकता दौड मध्ये सहभाग घेतला होता.



## लोगो, स्टीकर लावणे पडणार महागात ; रायगडच्या जिल्हा वाहतूक शाखेची कारवाई सुरु

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शासनाची मान्यता नसताना बेकायदेशीररित्या काहीजण गाडीला लोगो बसवणे, पोलीस, प्रेस, डव्होकेट स्टीकर लावण्याचे काम करतात. आता लोगो, स्टीकर लावणे महागात पडणार आहे. रायगडच्या जिल्हा वाहतूक शाखेने या विरोधात कारवाई सुरु केली आहे. आतापर्यंत ६६ चालकांविरोधात कारवाई करीत ३५ हजार रुपयांचा दंड वसूल केला असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईने स्टीकर, लोगो लावणाऱ्यांना दणका मिळाला आहे.



दुचाकीसह, तीन चाकी, चारचाकी व अन्य वाहनांवर स्टीकर, लोगो लावणे चुकीचे आहे. तरीदेखील काही मंडळी वाहनांवर स्टीकर, लोगो लावतात. हा गैरप्रकार टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. पोलीस, पत्रकार, प्रेस, महाराष्ट्र शासन आदी लोगो लावणाऱ्याबरोबरच गाडीला आकर्षक चित्र लावणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहिम हाती घेतली आहे.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी ही कारवाई सुरु केली आहे. जिल्ह्यात ९० हून अधिक वाहतूक पोलीस तैनात असून गाडीवर बेकायदेशीर स्टीकर, लोगो दिसल्यास त्यांच्या माध्यमातून कारवाई सुरु केली आहे. आतापर्यंत ६६ चालकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये पोलीस, प्रेस,डव्होकेट यांचा समावेश आहे. उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून मान्यता नसतादेखील गाडीवर स्टीकर, लोगो लावणाऱ्यांना दणका देण्यात आला आहे.

काही महाभाग पोलीस, पत्रकार, आमदार, वकील नसताना बिनधास्तपणे त्यांच्या वाहनांवर स्टीकर, लोगो लावून मिरवत असतात. पोलिसांच्या कारवाईपासून तसेच कोणीही रोखू नये म्हणून हा प्रकार केला जात असल्याचे बोलले जात आहे.

मात्र रायगडच्या जिल्हा वाहतूक शाखेने या प्रकारावर अंकुश ठेवण्यासाठी मोहिमच हाती घेतली आहे. त्यांच्या या मोहिमेतून अनेक वाहन चालकांसह मालकांना शिस्त लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, श्री लक्ष्मण महादेव गोंधळी राहणार मु खेरणेखुर्द, पो. देवीचापाडा, ता. पनवेल , जिल्हा - रायगड यांचे मालकीहक्कातील, ताबेकब्ज्यातील जमीन मिळकत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : मोहदर, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मोहदर | १५१ | २ | ०-४०-४०<br>पो.ख. ०-०३-१०<br>एकूण क्षेत्र ०-४३-५० | ४.१९ |

माझ्या अशील सौ वंदना निवृत्ती गोंधळी राहणार मु. खेरणे खुर्द, पो. देविचापाडा, ता-पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०८ हे सदरहू जमीन मिळकत मालक यांचे कडून कायम खरेदीने घेण्याच्या विचारात आहेत.

तरी सदरहू जमीन मिळकती बाबत अथवा त्यांच्या कोणत्याही पोटहिश्याचे बाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट , ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत गहाण, दान, बक्षीस चार्ज अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा, कोणत्याही प्रकारची बुकिंग वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात या प्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदरहू जमीन मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे समजून माझे अशील हे जमीन मिळकत धारक यांचे कडून सदरहू जमीन मिळकत अभी हस्तांतरण खरेदी व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : वावंजे, पनवेल
दिनांक : ०१/११/२०२५

सही/-
**ॲड.मनिष जयंता पाटील**
**मु पो-वावंजे, ता-पनवेल,**
**जिल्हा - रायगड.४१०२०८**
**मो.नं.९१६७६३१२८२/९५९४९३१२८२**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत सुभद्रा रमेश पाटील व इतर यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्र्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्र्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका पनवेल, मे. दुय्यम निबंधक, पनवेल, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे केळवणे, येथील मिळकत भूमापन नं. ९१/७ यांसी क्षेत्र ०.१९.२० हे. आर. प्र., पोटखराबा ०.०१.०० हे. आर. प्र. यांसी आकार रक्कम रुपये ३.०७ पैसे, यांसी चतुः सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीखः २ नोव्हेंबर २०२५

सही/-
**श्री.विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारा तर्फे वकिल,**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली,**
**बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सरदार १५० एकता पदयात्रा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशाचे पहिले उपपंतप्रधान, लोहपुरुष आणि एकीचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने सरदार १५० एकता पदयात्रा आणि विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि सरदार वल्लभभाई पटेल जयंती कार्यक्रम जिल्हा संयोजक व जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार यांनी आज (०१) येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांच्यासमवेत सरदार वल्लभभाई पटेल जयंती कार्यक्रम जिल्हा सहसंयोजक सुशिल शर्मा उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत माहिती देताना त्यांनी सांगितले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी 'विकसित भारत २०४७'चा संकल्प घेऊन देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्यरत असून त्या अनुषंगाने वाटचाल सुरु आहे. 'एक भारत, अखंड भारत' या भावनेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांचे व्यक्तिमत्त्व आणि दृढ इच्छाशक्ती युवा पिढीसाठी प्रेरणादायी आहे. याच भावनेतून राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर सरदार १५० एकता पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे.

त्याच धर्तीवर महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संयोजनाखाली विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ही जयंती साजरी करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत उत्तर रायगड प्रशासकीय जिल्हा स्तरावर तीन दिवसीय एकता पदयात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेत दररोज किमान ८ ते १० किलोमीटरचा प्रवास केला जाईल. यात्रेदरम्यान 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या भावनेला बळकटी देण्यासाठी विविध कार्यक्रमे होणार आहेत.

एकता पदयात्रेत एक हजार लोकं सहभागी होतील त्यामध्ये १५० भाजपचे कार्यकर्ते, एनएसएस व एनसीसीचे विद्यार्थी तसेच विविध संस्था संघटनांचा सहभाग असणार आहे. या पदयात्रेच्या समारोपात सामाजिक दृष्टिकोनातून पथनाट्य सादर होणार आहे. असे ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सांगितले.

काल संपूर्ण देशात एकता दौड मोठ्या उत्साहात संपन्न झाली. विशेषत्वाने पोलीस विभागाने याचे आयोजन केले आणि त्यामध्ये विविध संघटनांनी सहभाग घेतला होता. सरदार १५० एकता पदयात्रा तीन दिवस असणार आहे त्यामुळे याचे आयोजन चांगल्याप्रकारे व्हावे यासाठी नियोजन केले जात असून ०४ नोव्हेंबरला जिल्हा बैठकीत या पदयात्रेच्या तारखेच्या निश्चिती केल्या जाणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सांगितले. तसेच या पदयात्रेत नागरिकांनीही सहभागी व्हावे, असे आ-वाहन त्यांनी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.

# वंचित आघाडीतून स्वप्निल शिर्के निजामपूर जि. प निवडणूक लढविणार !



**दै.रायगड नगरी । माणगाव**

रायगड जिल्हा परिषद निवडणुकीचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर निजामपूर जिल्हा परिषद मतदार संघातून वंचित बहुजन आघाडीचे तरुण, गतिमान आणि जनतेच्या मनात घर करणारे कार्यकर्ते स्वप्निल शिर्के यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. स्वतः शिर्के यांनीही आपण या निवडणुकीत उमेदवारी अर्ज करणार असल्याचे जाहीर वक्तव्य करून या चर्चेला पुष्टी दिली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे रायगड जिल्ह्यात भक्कम संघटन असून निजामपूर मतदार संघात या पक्षाचा प्रभाव लक्षणीय आहे. स्वप्निल शिर्के यांनी गेल्या काही वर्षांत सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी गावागावात फिरून लोकांच्या अडचणी जाणून घेत त्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. समाजातील सर्व स्तरातील नागरिकांशी त्यांनी दांडगा संपर्क प्रस्थापित केला असून, तरुणांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांमध्ये त्यांचा विश्वास बसला आहे.

जनतेच्या सुखदुःखात सहभागी होणारा, सर्वांना बरोबर घेऊन चालणारा कार्यकर्ता म्हणून शिर्के यांची ओळख निर्माण झाली आहे. विकासाची नवी दिशा देणारा आणि समाजाच्या सर्व घटकांना न्याय देणारा उमेदवार म्हणून नागरिक त्यांच्याकडे पाहत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली निजामपूर विभागात वंचित आघाडीला नवी उभारी मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे.

स्वप्निल शिर्के यांच्या उमेदवारीच्या चर्चेमुळे इतर राजकीय पक्षांच्या शिबिरात चांगलीच खळबळ उडाली आहे. विविध पक्षांचे स्थानिक नेते व कार्यकर्ते त्यांच्या लोकप्रियतेमुळे चिंतेत आहेत. लवकरच शिर्के हे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन निजामपूर विभागात जाहीर सभा आयोजित करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

निजामपूर मतदार संघातील राजकीय समीकरणे आता नव्याने बदलण्याची शक्यता असून, स्वप्निल शिर्के यांच्या उमेदवारीने या निवडणुकीला निश्चितच वेगळे वळण मिळणार, असा सूर जनतेत उमटत आहे.

# मुरुडमध्ये लेखी आश्वासन देऊनही रस्त्याची कामे नाहीत : अरविंद गायकर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड येथील परेशनाका-मच्छिमार्केट ते खोकरी रस्त्याचे काम लेखी आश्वासन देऊनही मुदतीत न करण्यात आल्याने याविरोधात आगामी स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या होणा-या निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा व स्थगित केलेले उपोषण पुन्हा सुरु करणार असल्याचा इशारा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी आपल्या सहका-यांसमवेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता यांना एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, मुरुड तहसिल कार्यालय परेश होटेल-मच्छिमार्केट ते खोकरी या खराब झालेल्या रस्त्याबाबत दि.१७ फेब्रुवारी २०२५ रोजी आपणास लेखी स्वरुपात कळतुन मुरूड तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसलो असता,त्यादिवशी आपणाकडून कडुन १५ दिवसांची व दि. १८/०२/२०२५ रोजी कार्यकारी अभियंत्ता अलिबाग सा. बां. विभाग यांच्या कार्यालयाकडुन या रस्त्याचे काम १ महीन्यात चालु करण्याचे प्रयत्न करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने व तसेच अलिबाग मुरूड रोहा मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्याशी फोनवरून झालेल्या चर्चेअंती सदरचे उपोषण तात्पुरते स्थगीत करण्यात आले होते.

तसेच आपणाकडुन लेखी स्वरूपात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दि.२०/०३/२०२५ ते दि. ०१/०४/२०२५ पर्यंत सदर रस्त्याचे काम न केल्याने संबंधित अधिकारी कोणत्याही प्रकाची कारवाई न करता ठेकेदाराला पाठीशी घालुन स्थानिक जनतेची दिशाभुल करत असल्याचे दिसून येत आहे.


तरी सदर रस्त्याचे काम दि.१२/११/२०२५ रोजी पर्यंत ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकरी वर्ग यांनी जातीने लक्ष घालून पुर्ण न केल्यास आगामी येणा-या नगरपरिषद, जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांवर बहीष्कार टाकण्यात येईल व दि. १३/११/२०२५ पासुन स्थगित करण्यात आलेले उपोषण मुरूड तहसिल कार्यालयाच्या पटांगणात पुन्हा सुरु करण्यात येईल व यांची सर्वस्वी जबाबदारी संबधित खात्याची व ठेकेदारची राहील यांची नोंद घ्यावी.असे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून सदर निवेदनाच्या प्रती अलिबाग-मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी,सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता-रायगड व कोकण भवन-नवी मुंबई, जिल्हाधिकारी -रायगड, पोलिस अधीक्षक -रायगड व तहसीलदार -मुरुड यांना देण्यात आल्या आहेत.

पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, उपाध्यक्ष दिव्या सतविडकर, देवेन सतविडकर, इम्तियाज शहाबान, दादा आंबुकर सदस्य यावेळी उपस्थित होते.

# गडसंवर्धनाच्या कार्यातून उभी राहिली इतिहासाची प्रेरणा

## नव्या पिढीत रुजवली गडसंवर्धनाची जाणीव




**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव (जि. रायगड) येथील आम्ही सह्याद्रीचे शिलेदार ही सामाजिक संस्था गेल्या काही वर्षांपासून गडकोट संवर्धन आणि विविध सामाजिक कार्यात सक्रिय आहे. संस्थेमार्फत माणगांव तालुक्यातील मानगड, कुर्डुगड तसेच महाड तालुक्यातील कोकणदिवा किल्ल्यावर नियमितपणे गडसंवर्धनाचे काम केले जाते. संस्थेच्या माध्यमातून ऐतिहासिक वस्तू, वीरगळ, बारव यांचे संवर्धन, तसेच गरजूंना मदत, स्वच्छता व जनजागृती अभियान यांसारख्या उपक्रमांद्वारे समाजात इतिहासप्रेम आणि संवेदनशीलता जागविण्याचे कार्य केले जाते.

याच कार्याच्या प्रेरणेने अलीकडेच संस्थेच्या वतीने किल्ला स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत सह्याद्रीचे शिलेदार सामाजिक संस्था, माणगांव यांनी सहभाग घेत ऐतिहासिक किल्ल्यांच्या आकर्षक प्रतिकृती साकारल्या. स्पर्धेत गाव विघवली येथील आम्ही कलाकार छोटे मोठे या गटाने 'सिंहगड' किल्ल्याची सुंदर प्रतिकृती साकारून प्रथम क्रमांक पटकावला.

माणगांवच्या कुमार मयुरेश बापट याने 'मानाचा मानगड' किल्ल्याची प्रतिकृती तयार करून द्वितीय क्रमांक मिळवला, तर गाव चेरवली येथील कु. अभी योगेश खडतर याने 'सिंधुदुर्ग' किल्ल्याची प्रतिकृती साकारून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

तसेच गाव होडगाव येथील ओम खाडे, हर्षल खाडे, अथर्व खाडे, सार्थक शिंदे व शौर्य खाडे या बालकलाकारांनी 'प्रतापगड' किल्ल्याची अप्रतिम प्रतिकृती साकारत उत्तेजनार्थ (उत्साहवर्धक) मानकरी म्हणून गौरव प्राप्त केला. मुख्य उद्देश - गडसंवर्धनाची जाणीव नव्या पिढीत रुजवणे या स्पर्धेचा मुख्य हेतू म्हणजे गडसंवर्धनाची भावना व इतिहासाची जाणीव नव्या पिढीत रुजवणे हा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले गडकिल्ले हे केवळ दगड-मातीचे बांधकाम नसून आपल्या स्वाभिमान आणि स्वातंत्र्याचे प्रतीक आहेत. त्यामुळे या किल्ल्यांचे जतन, त्यांच्याशी जोडलेला इतिहास समजून घेणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे अत्यावश्यक आहे.

या माध्यमातून मुलांमध्ये गडप्रेम, देशभक्ती, शिस्त, टीमवर्क आणि संवर्धनाची जबाबदारी यांसारख्या मूल्यांची रुजवण होते.

गडकिल्ले आपला वारसा आहेत - त्यांचे रक्षण आणि संवर्धन हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. अशा उपक्रमांद्वारे गड वाचवा, इतिहास जपा हा संदेश समाजात पोहोचविण्याचा संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, श्री मनोहर दत्तू माळी राहणार. मु. खेरणेखुर्द, पो. देवीचापाडा, ता. पनवेल, जिल्हा -रायगड यांचे मालकीहक्कातील, ताबेकब्ज्यातील जमीन मिळकत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खेरणेखुर्द ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| खेरणे खुर्द | १२७ | ०-८२-२० | १३.३१ |
| वरील मिळकती पैकी श्री मनोहर दत्तू माळी यांच्या मालकीच्या खाते क्र. १६८ क्षेत्र ०-०६-७० हे. आर व पो. ख०-३-८० हे आर एकूण क्षेत्र -०-१०-५० हे आर. आकार १.२० रु पै. पैकी ०-०३-०० हे आर या मिळकत कायम खरेदीचा विषय आहे. | | | |

माझे अशील श्री सोपान सुदाम गोंधळी राहणार मु खेरणे खुर्द, पो देविचापाडा, ता-पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०८ हे सदरहू जमीन मिळकत मालक यांचे कडून कायम खरेदीने घेण्याच्या विचारात आहेत.

तरी सदरहू जमीन मिळकती बाबत अथवा त्यांच्या कोणत्याही पोटहिश्याचे बाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट , ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत गहाण, दान, बक्षीस चार्ज अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा, कोणत्याही प्रकारची बुकिंग वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात या प्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदरहू जमीन मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे समजून माझे अशील हे जमीन मिळकत धारक यांचे कडून सदरहू जमीन मिळकत अभी हस्तांतरण खरेदी व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : वावंजे, पनवेल
दिनांक : ०१/११/२०२५

सही/-
**ॲड.मनिष जयंता पाटील**
मु पो-वावंजे, ता-पनवेल,
जिल्हा - रायगड.४१०२०८
मो.नं.९१६७६३१२८२/९५९४९३१२८२



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील क. १. श्री. दत्तात्रेय सुदाम फुलोरे, २. श्री. देविदास सुदाम फुलोरे, ३. श्री. यशवंत सुदाम फुलोरे, ४. सी. बेबी गणेश पाटील, ५. वनिता दामन खाडेकर, ६. सौ. आशा चंद्रकांत बोंडे सर्व रा. मु. शिरवली, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या खालील नमूद केलेल्या जमीन मिळकती या वडालोपार्जित असून त्यांचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**शेतजमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| अनु क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ८९ | २/अ | ०-६४-३० पो.ख. ०-०४-५० | १२.१६ |
| २ | ८४ | १/२/१ | ०-६७-०० | २.०० |
| ३ | ८४ | १/२/३ | ०-६४-०० पो.ख. ०-०४-०० | १.९५ |
| ४ | १०८ | २/३/१ | ०-५९-०० | ६.०६ |
| ५ | ८४ | १/२/२ | ०-३१-०० | ०.९३ |

वरील वर्णन केलेल्या शेत जमिन मिळकतीबाबत माझे अशिल यांनी दि. ३१/०१/२०२५ रोजी मे. पनवेल येथिल दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात सदर मिळकतीबाबत ठरावाकरीता, वाटपाकरीता, तसेच मनाई हुकूमाकरीता रेग्युलर मुकदमा क. ३०/२०२५ असा दावा दाखल केलेला असुन सदर प्रकरण हे आजरोजी पर्यंत मे. दिवाणी न्यायालय पनवेल यांचेकडे प्रलंबीत आहे. याबाबत माहीतीकरीता माझे अशिल यांनी पनवेल येथिल सह दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये दाव्याबाबत लिस पेंडन्सी देखिल नोंदणीकृत केलेली आहे.

सदर शेत जमिन मिळकतीमध्ये माझे अशिल यांचे हक्क हितसंबंध निगडीत आहेत. त्यामुळे सदर शेत जमिन मिळकतीबाबत कोणीही अन्य त्रयस्त ईसम यांनी जमिन मिळकतीचे सह मालक यांच्याशी खरेदी-विकी संदर्भात अथवा कोणत्याही प्रकारचा कसलाही व्यवहार अथवा ठराव करु नये. अन्यथा त्यापासून होणा-या परिणामांस आपणच जबाबदार रहाल. मात्र या उप्परही कोणीही सदर शेत जमिन मिळकती संदर्भात कसलाही व्यवहार केल्यास तो माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच माझे अशिलांचे सामाईक हक्क च अधिकारास बाधा निर्माण करून व्यवहार केल्यास सदर व्यक्ती अथवा अयरत ईसम कायदेशीर कारवाईस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : ०१/११/२०२५

सही/-
**ॲड.राजकुमार वि. जाधव**
शॉप नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाटयगृह जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत हसुराम रामा गावंड व इतर यांच्या मालकी हक्क व कब्जे वहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काहीही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे आवरे येथील खालील मिळकत

| अ.क्र. | सर्व्हे क्रं. | एकूण क्षेत्र हे.आर.प्र. | पोटखराबा हे.आर.प्र. | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | १६/११ | ०.०३.०० | ०.००.०० | ०.०६ |
| २ | ७६/९/अ | ०.०१.३० | ०.००.०० | ०.५० |
| ३ | २११/१/अ | ०.१०.१० | ०.०१.०० | ०.४४ |

यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.
येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त. रायगड,
रायगड, तारीखः २ नोव्हेंबर २०२५

सही/-
**श्री.विनायक र. ताम्हणकर, वकिल**
खरेदीदारा तर्फे वकिल,
३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली,
बदलापूर (प.) ४२१५०३.
भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे मोहो, तालुका -पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिल श्री. समाधान बबनराव शिंदे, राहणार २०३, शिवानंद को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. ६९, सेक्टर नं. २०, खारघर, नवी मुंबई यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**:: मिळकतीचे वर्णन ::**
**मौजे मोहो, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| भोगवटादाराचे नांव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|
| रजनी जगदीप सेहगल<br>अंकिता जगदीप सेहगल | ३१/२ | १-०६-००<br>पोट खराबा ०-३१-००<br>एकुण क्षेत्र १-३७-००<br>पैकी विक्री क्षेत्र ०-४०-०० | १.०० |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, कुळ हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुद-तीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०१/११/२०२५

सही/-
**ॲड.शेखर ज. खोपकर**
९८, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
मो.नं. ८६५५१ ५८७८१/९८६७७ २९८२७

# ७० वर्षीय नराधमाचे १० वर्षीय बालिकेवर दोन वर्षे लैंगिक अत्याचार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संपूर्ण पनवेल परिसराला हादरवून सोडणारी एक अत्यंत भीषण आणि हृदयद्रावक घटना तळोजा परिसरात उघडकीस आली आहे. लंडनमध्ये राहणाऱ्या एका ७० वर्षीय वृद्धाने भारतात येऊन अवघ्या दहा वर्षांच्या अल्पवयीन बालिकेवर तब्बल दोन वर्षांपासून वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा अत्यंत किळसवाणा प्रकार समोर आला आहे. या घटनेतील सर्वात धक्कादायक आणि संतापजनक बाब म्हणजे, या संपूर्ण अत्याचाराच्या प्रकरणात त्या चिमुरडीची जन्मदात्री आईच आरोपीला सक्रियपणे मदत करत असल्याचे तपासात उघडकीस आले आहे. नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने केलेल्या तपासात पैशांच्या लालसेपोटी हा माणुसकीला काळीमा फासणारा प्रकार घडल्याचे आढळुन आले आहे. पोलिसांनी या नराधम आरोपीसह पीडित बालिकेच्या निर्दयी आईलाही अटक केली आहे.

या प्रकरणात अटक करण्यात तो मुळचा पाँडेचेरी येथील रहिवाशी आलेल्या ७० वर्षीय वृद्धाचे नाव आहे. मात्र सध्या तो लंडन येथे फारुक अल्लाउद्दीन शेख असे असून कुटुंबासह स्थाईक आहे. आरोपी फारुक शेख याने दोन वर्षापुर्वी तळोजा सेक्टर-२० मधील एक फ्लॅट विकत रक्त गोठवणारी घटना ! लंडनहून आलेल्या ७० वर्षीय नराधमाचे १० वर्षीय बालिकेवर दोन वर्षे लैंगिक अत्याचार घेतला होता. या फ्लॅटवर तो दोन तीन महिन्यातून एकटा लंडन येथून दोन तीन दिवसासाठी येत होता. यादरम्यान पीडित मुलीच्या आईसोबत त्याची घरकामाच्या निमित्ताने ओळख झाली होती, आरोपी फारुक शेख लंडन येथून तळोजा येथे आल्यास पीडित मुलीशी आई आपल्या दहा वर्षाच्या मुलीला त्याच्या घरी खेळण्याच्या बहाण्याने सोडुन निघुन जात होती. या दरम्यान आरोपी पीडित मुलीला मद्य पाजुन तिच्यावर लैंगिक अमानुषपणे अत्याचार करत होता. जर तिने कोणाला सांगितले, तर जीवे मारण्याची धमकी देऊन तिला गप्प बसवत होता. गेल्या दोन वर्षांपासून हा प्रकार सुरु होता.

काही दिवसापुर्वी आरोपी फारुक शेख हा लंडन येथून तळोजा येथे आपल्या फ्लॅटवा आला होता. त्यानंतर त्याने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यास सुरुवात केली होती. याबाबातची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश देशमुख, निलम पवार, सरिता गुडे, आर्दींच्या पथकाने या नराधमाच्या फ्लॅटवर छापा मारला, त्यानंतर आरोपी फारूक शेख याला ताब्यात घेऊन पीडित मुलीची सुटका केली.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष व तळोजा पोलिसांनी पीडित मुलीच्या आईकडे चौकशी केली असता, त्यांनाही धक्का बसला. पीडित मुलीच्या आईने आरोपी फारुक शेख याच्याकडुन घर भाड्याने घेण्यासाठी अडीच लाख रुपये घेतले होते, त्याचप्रमाणे दर महिन्याचे रेशन धान्य देखील फारुककडून मिळणाऱ्या रकमेतूनच ती खरेदी करत होती. या पैशांसाठी ती आपल्या १० वर्षाच्या मुलीला वारंवार फारुकच्या घरी पाठवत असल्याचे तपासात उपड झाले आहे. आपल्या मुलीवर ७० वर्षाच्या व्यकीकडून लैंगिक अत्याचार होत असल्याची माहिती असूनही केवळ पैशांच्या मोहापायी निर्दयी आईने हे घृणास्पद कृत्य सुरु ठेवल्याचे तिच्या चौकशीत उघड झाले आहे. पैशांची लालसा आणि मायेची किंमत न करणाऱ्या जन्मदात्रीच्या या कृत्याने पोलीस अधिकारीही स्तब्ध झाले आहेत.

याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात बलात्कारासह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपी फारुक अल्लाउद्दीन शेख आणि त्याला साथ देणारी पीडित मुलीची जन्मदात्री आई या दोघांनाही पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण तळोजा परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या आरोपीच्या फ्लॅटच्या तपासणीत दारुची बॉटल, सेक्स पॉवरच्या गोळ्यांची पाकिटे, सेक्स टॉय, व्हॉब्रेटर, पॉसलीन, डिजीटल हीडीओ रेकॉर्डर, डिव्हीआर अशा अनेक संशयास्पद बस्तु आहळुन आल्या असून पोलिसांनी या सर्व वस्तू जप्त केल्या आहेत.

# ‘संगीत मॅरेथॉन’मधून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याला स्वरबद्ध सलामी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आज पनवेलमध्ये ’उत्कर्ष संगीत मैफिल’ तर्फे ‘संगीत मॅरेथॉन’चे आयोजन करण्यात आले. या विशेष उपक्रमात ७५ गायकांनी एकापाठोपाठ ७५ सुमधुर गाणी सादर करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याला स्वरबद्ध सलामी दिली.

राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक प्राधान्य देणारे, जनतेच्या मनात घर करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हे एक थोर समाजसेवक म्हणून ओळखले जातात. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली असून आजही ती तितक्याच जोमाने त्यांचे सामाजिक सुरू आहे. त्यामुळे या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर याचे अखंड सामाजिक कार्य अधोरेखित करण्यात आले. गायक गोपाळ पाटील यांच्या संकल्पनेतून हा भव्य कार्यक्रम पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आला होता. या संगीत मॅरेथॉन मध्ये सकाळी ११.३० वाजल्यापासून सलग साडेसात तास मराठी व हिंदी गाण्यांचे सादरीकरण झाले. गायक गोपाळ पाटील यांच्यासह उरण, पनवेल आणि नवी मुंबई येथील ७५ गायकांनी गाण्याचे सादरीकरणे केले. या कार्यक्रमाचा शुभारंभ प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. व्यासपीठावर आगमनाच्या वेळी गायक रवी नाईक यांनी ‘रामजी की निकली सवारी’ हे गाणे सादर केले. त्या सुरेल सादरीकरणाच्या पार्श्वभूमीवर उपस्थितांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर पुष्पवृष्टी करत उत्स्फूर्त



स्वागत केले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चंद्रकांत घरत, रविनाथ पाटील, ब्रिजेश पटेल, नरसू पाटील, एकनाथ ठाकूर, नरेश रहाळकर, भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक रविंद्र भगत, ॲड. नरेश ठाकूर, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, सिमा घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, समीर कदम, दीपक शिंदे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांच्यासह रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. गेली पाच दशकाहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली आहे आणि हे कार्य त्यांच्याकडून अखंडपणे सुरूच आहे. यंदा त्यांनी आपल्या वयाच्या ७५ व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने पूर्ण वर्षभर अनेक सामाजिक कार्यक्रमे होणार होत आहेत. या सामाजिक उपक्रमांच्या मालिकेतच ‘संगीत मॅरेथॉन’ हा सांस्कृतिक सोहळा एक सुरेल मेजवानी ठरली.

> संगीत हे मनाला जोडणारे माध्यम आहे. गोपाळ पाटील यांनी चांगल्या गायकांचा संघ तयार केला आहे. अशा उपक्रमामुळे कलाकारांना वाव मिळणार आहे. आणि त्यासाठी माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा. माझ्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सर्व गायकांचे आणि टीमचे मनः पूर्वक आभार !
>
> **– लोकनेते रामशेठ ठाकूर**

# आज महाड येथे रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचा सुवर्ण महोत्सवी सोहळा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्र राज्य रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचा सुवर्ण महोत्सवी सोहळा रविवार दिनांक २ नोव्हेंबर रोजी महाड, जिल्हा रायगड येथे श्री. विश्वास काटकर, सरचिटणीस राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र त्यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले, रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री ना. भरतशेठ गोगावले, सार्वजनिक बांधकाम विभाग सचिव एच.डी. दशपुते,जलसंपदा विभाग व लाभक्षेत्र विकास सचिव डॉ. संजय बेलसरे हे उपस्थित राहणार आहेत.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे हा कार्यक्रम सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष जकी अहेमद जाफरी, उपाध्यक्ष रवींद्र बिंड व राहुल साळुंखे, सरचिटणीस सुधीर गभणे, अतिरिक्त सरचिटणीस विनायक जोशी, कोषाध्यक्ष सौ. वंदना परिहार, सहकोषाध्यक्ष अमोल सुपेकर उपस्थित राहणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष जकी अहेमद जाफरी यांनी दिली आहे.

संघटनेच्या सुवर्ण महोत्सवी सोहळयाचे औचित्य साधून रविवार दिनांक २ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते १० वा. सभासद नोंदणी, १०.३० वा. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, ११ वा. मान्यवरांचे स्वागत व सत्कार, ११.३० वा. सरचिटणीस प्रास्ताविक करतील, १०.४० वा. संघटनेचे अध्यक्ष आपले मनोगत व्यक्त करतील, १२ वा. मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन, १२.१० वा. प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान, १२.३० वा. मान्यवरांचे व प्रमुख अतिथींचे मनोगत, दुपारी २ वा. स्नेहभोजनाचे आयोजन केले आहे.

दुसऱ्या सत्रात दुपारी ३ वा. संघटनेचे पदाधिकारी यांचा सत्कार व त्यांचे मनोगत, सायंकाळी ४.३० वा. अध्यक्षीय भाषण, सायंकाळी ५वा. आभार प्रदर्शन व कार्यक्रमाचा समारोप होईल. सुवर्ण महोत्सवी सोहळयात कोणतीही कमतरता राहू नये यासाठी कोकण कोअर कमिटीचे सर्व सदस्य अहोरात्र मेहनत घेत आहेत. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

तरी या कार्यक्रमासाठी संघटनेच्या सर्व सभासदांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष नरेंद्र महाडिक यांनी केली आहे. या कार्यक्रमासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून मिळून अंदाजे ७०० सभासद उपस्थित राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

# मुली मानसिक रित्या सदृढ असल्या तरच शाररिकरित्या सदृढ राहतील : ना.अदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

जागतिक मानसिक आरोग्य महिन्या निमित्त,मुलींसाठी जीवन कौशल्य शिकण्याची, मनोबल वाढवण्याची आणि मोठी स्वप्न बघण्याची संधी प्राप्त करुन देण्यासाठी श्रीवर्धन येथील र. ना. राऊत. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात श्रीवर्धनच्या आमदार तथा राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाच्या कॅबिनेट मंत्री अदिती तटकरे यांच्या प्रोत्साहनातून बेंगलोर येथील वायझा या संस्थेच्या वतीने र. ना. राऊत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय श्रीवर्धन येथे दिनांक १० ऑक्टोबर २५ ते ११ नोव्हेंबर २५ या दरम्यान उपक्रम राबवण्यात येत आहे.



या उपक्रमात बोलताना नाम. अदिती तटकरे म्हणाल्या की, मुली मानसिक रित्या सदृढ असल्या तरच शाररिकरित्या सदृढ राहतील,आजच्या मुली मन मोकळे पणाने आपल्या पालकांशी किंवा कोणाजवळ ही बोलत नाहीत, व्यक्त होत नाहीत, या उपक्रमातील ड्रीम किटच्या माध्यमातून त्यांची मानसिकता जाणून घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करायचा आहे. या वेळी व्यासपीठावर प्रांतधिकारी महेश पाटील,संस्थेचे डॉ अमरीश दरक, स्मृती जोशी, तिवारी, सही पाटील, तसेच श्री. ता. शि. प्र.व सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष अनिल भुसाणे, स्थानिक शाळा समिती चेअरमन जितेंद्र सातनाक, अनंत गुरव, प्रविता माने, राजसी मुरकर, पुलेकर गुरुजी, मोहन वाघे, आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना नाम. तटकरे म्हणाल्या की, मोबाईलचे चांगले परिणाम काय, वाईट परिणाम काय याचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे, किशोरवयीन मुलींच्या मानसिक व आरोग्य वाढीकडे लक्ष देणे गरजेचे आहे,पाहिलेची पिढी वेगळी होती, आताची पिढी वेगळी आहे, आताच्या पिढीची मानसिकता ओळखणे गरजेचे आहे.

समाजात कसे वागावे हे विचार आजच्या पिढीत रुजवणे गरजेचे आहे,आजची जवाबदारी महत्वाची आहे, पुढे काय करायचे आहे हे महत्वाचे नाही,मला पत्रकार नेहमी विचारतात तुम्हाला पहिली महिला मुख्यमंत्री व्हायला आवडेल का? तर मी त्यांना सांगते आज कमी वयात मला मंत्रिपदावर काम करायला मिळत आहे हे काय कमी नाही, मला आत्ता मिळालेल्या मंत्रिपदाचा उपयोग जनतेसाठी जास्तीत जास्त कसा करता येईल हे पाहते आणि माझ्या दृष्टीने आजचेच महत्वाचे आहे.

आजच्या पिढीत नकारात्मता भरू नका जास्तीतजास्त सकारात्मक विचार द्या असे सांगून वायझा संस्थेच्या वतीने र. ना. राऊत विद्यालयाला २७ लक्ष रुपयाचे साहित्य सुपूर्द केले. कार्यक्रमात प्रास्ताविक डॉ दरक क यांनी केले तर मनोगत स्मृती जोशी यांनी व्यक्त केले, विद्यालयाची विध्यार्थिनी कु.सांची मोहिते हिने या उपक्रमातील आलेला अनुभव महत्व व फायदे सांगितले,

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वायझा संस्थेची प्रतिमा लोमाटे हिने केले विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक संदीप भगत यांनी संबंधित वायझा संस्थेचे आभार मानले तर उपस्थितीतांचे आभार जितेंद्र सातनाक यांनी मानले.

# मोतीराम तलावावरील परप्रांतीयाने बांधलेले बांधकाम मनसेने केलेल्या विरोधामुळे तत्परतेने तोडले

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड उपजिल्हा अध्यक्ष संदिप ठाकुर यांच्या नेतृत्वाखाली पेण शहरातील पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाणारे मोतीराम तलावावरील अनधिकृत बांधकाम मनसेने फेसबुक लाईव्ह द्वारे महाराष्ट्रासमोर आणले होते.

सदर अनधिकृत बांधकामे करुन मोतीराम तलावावरील धर्माच्या नावे परप्रांतीयाचा डाव मनसेने मोडीत काढला असून,मोतीराम तलाव हे सकाळी मार्नींग वॉक करीता प्रसिद्ध असून असंख्य पेणकर येथे ये जा करीत असतात,अश्याने शहाराच्या पर्यटनाचे तीन तेरा वाजवायचा प्रयत्न कोणी करीत असल्यास ते मनसे खपवुन घेणार नाही तथा अश्या परप्रांतीय जर मुजोरी करुन काही अनधिकृत करणार असतील तर ते मनसे खपवुन घेणार नाही असे मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संदिप ठाकुर म्हणाले.

पण मनसेच्या २४ तासाच्या अल्टीमेटमला पेण नगरपरिषदेने १२ तासातच कारवाई करीत कार्यतत्परता दाखवून अनधिकृत बांधकाम पाडले त्याबद्दल मनसेने नगरपरिषदेचे धन्यवाद मानले आहे.

# नाभिकाने केला ग्राहकावर वस्ताऱ्याने गंभीर वार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पैशाच्या वादातून नाभिकाने एका ग्राहकावर वस्ताऱ्याने गंभीर वार केल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली आहे .

नवीन पनवेल येथील मंगलमूर्ती मार्केट या ठिकाणी असलेल्या दीपक हेअर कटिंग सलून येथे रवींद्र कल्लाप्पा वाघमारे (वय ३५ वर्षे धंदा ड्रायव्हर) हा केस कटिंग करण्यासाठी गेला असता येथील कामगार सीठा रघुवीर सिंग (वय २९ वर्ष राहणार देवद ) याच्याकडे फिर्यादी रवींद्र वाघमारे केस कापण्यासाठी गेला असता सिठा रघुवीर सिंग याने ’आदी प्रथम पैसे दे मग तुझे केस कापतो’ असे बोलले असता त्या कारणावरून फिर्यादी रविंद्र व आरोपी सिठा सिंग वाद होऊन त्यातील आरोपी याने त्याच्या हातातील दाढी करण्याच्या वस्तऱ्याने फिर्यादी याच्या उजव्या डोळ्याच्या खालील बाजूपासून उजव्या गालावर ओठापर्यंत वार करून गंभीर दुखापत केली. रवींद्र वाघमारे याला एमजीएम हॉस्पिटल येथे उपचारासाठी ठेवले असून सदर प्रकरणाचा तपास खदिश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय परशकर करत आहेत. या घटने आरोपी सिठा सिंग याला अटक केली असून दीपक हेअर कटिंग सलून मंगलमूर्ती मार्केट नवीन पनवेल हे दुकान तपासासाठी सेल केले आहे या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक संजय पारसकर करत आहेत.

# सुधागड तालुक्यात प्राचीन बौद्ध मूर्तीचा शोध

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

रायगड जिल्ह्यातील इतिहास संपन्न सुधागड तालुक्यात पुन्हा एकदा प्राचीन वारशाचे दर्शन घडले आहे. तिवरे गावाजवळील बंद पडलेल्या अल्ट्रा कंपनीच्या परिसरात तथागत गौतम बुद्ध यांच्या प्राचीन मूर्तीचे तसेच अन्य काही शिल्पांचे अवशेष आढळून आले आहेत. या अनपेक्षित शोधाने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून बौद्ध समाजातही उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही घटना ३१ ऑक्टोबर रोजी रात्री घडली. एका स्थानिक इन्स्टाग्राम यूजरने या मूर्तीचे छायाचित्र व व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केल्याने हा प्रकार प्रकाशात आला. काही तासांतच ही पोस्ट व्हायरल झाली आणि परिसरातील बौद्ध अनुयायांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठी गर्दी अल्ट्रा कंपनीच्या परिसरात जमा झाली.

घटनास्थळी एक प्राचीन धम्मचक्रसदृश चाक (जाता) आणि बुद्ध मूर्तीचे अवशेष स्पष्ट दिसत होते. या दगडी मूर्तींवरील कोरीव काम व मूर्तीची मुद्रा पाहता ती बौद्ध कालखंडातील असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

घटनास्थळी आलेल्या बौद्ध अनुयायांनी पंचशील ध्वज रोवून त्या जागेचा सन्मान राखला. त्यांनी परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून, या ठिकाणी कोणत्याही प्रकारे विडंबन होऊ नये आणि या अवशेषांचे रक्षण व्हावे, अशी सामूहिक भावना त्यांनी व्यक्त केली.दरम्यान, गर्दी वाढत असल्याने पाली पोलिस ठाण्याच्या निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी तहसीलदार कार्यालय व पुरातत्त्व विभागाला याबाबत माहिती दिली आहे. सदर मूर्ती त्या ठिकाणी कशी आली, ती कुठल्या कालखंडातील आहे, तसेच आणखी काही शिल्प अथवा वास्तू अवशेष त्या परिसरात आहेत का, याबाबतचा तपास पुरातत्त्व विभागाकडून करण्यात येणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राथमिक तपासानंतरच मूर्तीची खरी ओळख आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट होणार आहे.सुधागड तालुका हा इतिहास, संस्कृती व वारसा यांचा संगम म्हणून ओळखला जातो. अशा पार्श्वभूमीवर तिवरे परिसरातील हा शोध हा केवळ धार्मिकच नव्हे तर सांस्कृतिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. स्थानिक नागरिकांकडून या ठिकाणी पुरातत्त्व विभागाने त्वरित उत्खनन करून अभ्यास करावा, अशी मागणीही होत आहे. सध्या या घटनेने संपूर्ण तालुक्यात चर्चा रंगली असून, अनेक सामाजिक संस्था व बौद्ध संघटनांनी या ठिकाणी भेट देण्याचे नियोजन केले आहे.

